नि.दि.दावा क्र. ८३/२०१५
मुरलीधर पाटील +१ वि. हिम्मत पाटील+२

CNR-MHDH05-001491-2015

**निशाणी क्र. ७९ वर आदेश**
**(पारित दिनांक २७.०२.२०२३)**

वादी यांचा अर्ज व त्यावरील प्रतिवादी यांचे खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्ज :**

२. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी आजचे कामकाज तहकूब होऊन मिळणेसाठी केला आहे. वादी यांचे थोडक्यात कथन की, प्रस्तुत प्रकरणात वादी यांना आज रोजी साक्षीदार देणे होते, परंतु माहितगार वकील लग्ननिमीत्त बाहेरगांवी गेले असल्याने आज रोजी न्यायालयात हजर नाही. सबब आजचे कामकाज तहकूब होऊन पुढील मुदत मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

**खुलासा :**

३. प्रतिवादी यांचेतर्फे प्रस्तुत अर्जावर हरकत घेण्यात आली. अर्ज हा टेनेबल नाही, सबब नामंजुर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दावा हा वाटणी व कब्जासाठी दाखल करण्यात आला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरुध्द विना खुलासा चालविण्यात यावे आणि प्रतिवादी क्र. ३ यांच्या विरुध्द एकतर्फा चालविण्यात यावे या आशयाचा आदेश दिनांक १३.०४.२०१६ रोजी पारीत करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी अर्ज दाखल केला आणि सदरचा अर्ज न्यायालयाने दिनांक २९.०९.२०१८ रोजी मंजुर केला आणि

नि.क्र. ५२ अन्वये प्रतिवादी यांचे लेखी जबाब अभिलेखावर दाखल करण्यात आले. दाव्यामध्ये माझे पुर्वाधिकारी यांनी नि.क्र. ५३ अन्वये वादमुद्दे निश्चित केल्याचे अभिलेखावरुन दिसून येते.

**५.** यापुर्वी वादी क्र. १ यांच्यातर्फे सरतपासणीचे शपथपत्र नि.क्र. १६ अन्वये अभिलेखावर दाखल करण्यात आला आहे. तसेच वादी क्र. २ यांनी देखील नि.क्र. ४१ अन्वये सरतपासणीचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यानंतर नि.क्र. ४३ अन्वये पुरसीस देखील दाखल आहे.

**६.** वादी यांच्यातर्फे नि.क्र. ५६ अन्वये दुरूस्तीचा अर्ज दाखल करण्यात आला. सदरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केल्याचा दिसून येतो. तसेच त्यानंतर नि.क्र. ५८ अन्वये दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ यांना समाविष्ठ करण्यासाठी अर्ज आहे. सदरचा अर्ज न्यायालयाने दिनांक २३.११.२०२१ रोजी मंजुर केला. त्यावरुन प्रतिवादी क्र. ४ यांना दाव्यात सामील करण्यात आले. प्रतिवादी क्र. ४ यांना दाव्याचे समन्स मिळाल्याचे दिसून येते. त्याबाबतचा अहवाल नि.क्र. ६१ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ४ यांच्यातर्फे नि.क्र. ६४ अन्वये अर्ज दाखल करण्यात आला. सदरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केल्याचा दिसतो. प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक २९.०३.२०२२ रोजी हजर झाले. परंतु त्यांना दाव्याच्या समन्सची बजावणी दिनांक १८.०१.२०२२ रोजी झाल्याची दिसते. त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही म्हणून न्यायालयाने त्यांचे विरुध्द प्रकरण विना खुलासा चालविण्यात यावा, या आशयाचा आदेश दिनांक ०१.०७.२०२२ रोजी पारित केला.

**७.** मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम हा न्यायालयीन कामाकाजवर देखील झाला होत. न्यायालयीन

कामकाज हे मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेल्या परिपत्रकान्वये सुरू होते. मा. उच्च न्यायालयाच परिपत्रकान्वये कामकाज हे दिनांक ०२.०८.२०२१ पासून पूर्ववत सुरु झाले आहे.

८. त्यानंतर नि.क्र. ६८ अन्वये वादी यांचा सरतपास हा नोंदविला. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचा उलट तपास हा दिनांक ०६.०१.२०२३ रोजी पुर्ण केला. त्यापुर्वी प्रकरण हे वेळोवेळी तहकूब झाल्याचे दिसून येते. नि.क्र. ७७ वरील अर्जान्वये वादी यांना न्यायालयाने निर्देश दिल्याचे दिसून येते. त्यानंतर आज सुध्दा वादी यांचेतर्फे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आला.

९. दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश १७ हे तहकुबी बाबतचे आहे. यामध्ये तीन वेळेस तहकुब करावे, या आशयाचा मानद आहे, असे दिसून येते. प्रकरण हे पाच वर्षापासून प्रलंबित आहे. याची वादी यांना जाणीव आहे. या ठिकाणी वादी यांनी विधिज्ञांचे वैयक्तीक कारण नमुद केले आहे. सबब अभिलेखावरील एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**आदेश**

- अर्ज हा रुपये २००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र)मंजुर करण्यात येते.
- सदरची शास्ती ही प्रतिवादी यांना अदा करण्यात यावी.
- वादी यांना निर्देश देण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेच्या आत प्रकरणात योगय ती कार्यवाही करावी.

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2023.02.27 17:28:47 +0530

साक्री. **( रा.भा.डोळे )**

दिनांक : २७.०२.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

: **<u>प्रमाणपत्र</u>** :

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – २७.०२.२०२३.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३